# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९

# मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेमधील पात्र लाभार्थी महिलांना व्यावसायाकरीता मध्यम मुदत कर्ज धोरण.

Z:\Vaishu\Karj Dhoran2025\Date 01.01.2025\Individual\Covering.Doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

## ''मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण'' योजनेमधील पात्र लाभार्थी असलेल्या गरजू, कष्टकरी व आर्थिक दुर्बल महिलांना व्यावसायाकरीता मध्यम मुदत कर्ज धोरण.

**दिनांक १९/०६/२०२५ पर्यंत अद्यावत बदलासह.**
**मा.संचालक मंडळ सभा दिनांक २५/०३/२०२५, ठराव क्रं.२१ अन्वये मंजूर**

बँकेच्या कार्यक्षेत्रामधील वास्तव्य असलेल्या तसेच महाराष्ट्र शासनाच्या ''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' योजनेमधील पात्र लाभार्थी असलेल्या गरजू, कष्टकरी व आर्थिक दुर्बल महिलांना व्यावसायाकरीता मध्यम मुदत कर्ज धोरण खालीलप्रमाणे.

**अर्जदार महिलांसाठी पात्रता/ निकषः**

१. बँकेच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य असलेली लाभार्थी महिला कर्ज मागणीस पात्र असेल.
२. एका कुटुंबातील एकच लाभार्थी महिला बँक कर्ज मागणीस पात्र असेल.
३. अर्जदार लाभार्थी महिलेस व महिलांच्या गटास दोन लाभार्थी महिला जामिनदार द्याव्या लागतील (कर्ज मागणी करणाऱ्या लाभार्थी महिला एकमेंकींना तसेच एका गटातील महिला दुसऱ्या गटास जामिनदार राहू शकतात. )
४. अर्जदार लाभार्थी महिलेने किमान वयाची २१ वर्षे पूर्ण केलेली असावी व कमाल वयाची मर्यादा ६० वर्षे इतकी राहिल.
५. कर्ज मागणी करणाऱ्या लाभार्थी महिलेचा तसेच जामिनदार महिलेचा ''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' योजनेअंतर्गत मागील तीन महिन्याचा लाभ मुंबै बँकेच्या आधार लिंक केलेल्या बचत खात्यात जमा झालेला असावा.

मध्यम मुदत कर्ज धोरणा अंतर्गत येणाऱ्या खालील व्यावसायाची यादी उदाहरणार्थ देण्यात आलेली असून यापैकी किंवा या व्यावसायासारखे इतर व्यवसाय विचारात घेण्यात यावेत.

| अ. क्र | व्यावसायाचे नाव | अ. क्र | व्यावसायाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | दुग्ध, दही,ताक, पनीर विक्री केंद्र | १९ | मोबाईल ॲसेसरीज /स्क्रीनगार्ड कव्हर विक्री |
| २ | चिकन, मटण, अंडी विक्री केंद्र | २० | लहान मुलांची खेळणी, रेडिमेड टॉईज विक्री |
| ३ | मसाल्याचे पदार्थ तयार करणे/विक्री करणे | २१ | घरगुती जेवणाचे डबे पुरवण्याचा व्यवसाय |
| ४ | पापड तयार करणे / विक्री करणे | २२ | बॅनर/कॅलेंडर /व्हिजिटींग कार्ड छपाई व्यवसाय |
| ५ | लोणची तयार करणे / विक्री करणे | २३ | भंगार व्यवसाय, रद्दी पेपर्स व मेटल |
| ६ | मेणबत्ती / अगरबत्ती विक्री करणे | २४ | निवडलेले धान्य विक्री करण्यासाठी |
| ७ | पर्स / पॉकेट तयार करणे / विक्री करणे | २५ | फळ विक्री व्यवसाय |
| ८ | भाजीपाला विक्री / व्यवसाय | २६ | फरसाण चिवडा विक्री |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | लेडीज पार्लर, मेहंदी व्यवसाय | २७ | कॅटरिंग व्यवसाय |
| १० | हॉटेल व्यवसाय, चहा,नाष्टा, जेवण | २८ | आईस्क्रिम पार्लर, केक चॉकलेट विक्री करणे |
| ११ | कापड दुकान व्यवसाय, | २९ | घरगुती खानावळ |
| १२ | किराणा दुकान व्यवसाय | ३० | वर्तमानपत्र विक्री |
| १३ | झेरॉक्स / प्रिन्टर्स व्यवसाय | ३१ | मसाला कांडप डंक |
| १४ | साडीवर नक्षीकाम (एम्ब्रायडरी) व्यवसाय | ३२ | फुलांचे व्यवसाय |
| १५ | फॉल बिडींग व्यवसाय | ३३ | रेडिमेड बुट / चप्पल विक्री |
| १६ | ओली / सुखी मच्छी विकण्याचा व्यवसाय | ३४ | घरघंटी व्यवसाय |
| १७ | टेलरिंगचा व्यवसाय | ३५ | रेडिमेड खेळणी /साहित्य विक्री |
| १८ | रेडीमेड चष्मा विक्री | ३६ | पोळी भाजी केंद्र |

**कर्जमागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :**

१) बँक कर्ज मागणी अर्ज (बँकेच्या विहित नमुन्यातील )

२) अर्जदार व जामिनदार यांचा नाममात्र सभासदत्व अर्ज (बँकेच्या विहित नमुन्यातील )

३) अर्जदाराची के.वाय.सी. व जामिनदाराची के.वाय.सी. कागदपत्रे सादर करणे आवश्यक (आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशनकार्ड, मागील महिन्याचे लाईट बिल, प्रत्येकी दोन फोटो आवश्यक)

४) विशेष कार्यकारी अधिकारी (SEO) यांनी प्रमाणित केलेले रु.२.५० लाखापेक्षा कमी असल्याबाबतचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

   अ) पिवळी अथवा केशरी शिधापत्रिका असल्यास उत्पन्न प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

   ब) शुभ्र शिधापत्रिका असल्यास अथवा कोणतीही शिधापत्रिका नसल्यास वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापर्यंत असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

   क) नवविवाहितेच्या बाबतीत रेशनकार्डवर तिच्या नावाची नोंद नसल्यास विवाह प्रमाणपत्र असलेल्या अशा नवविवाहितेच्या पतीचे रेशनकार्ड हे उत्पन्नाचा दाखला म्हणून सादर करावा लागेल.

५) व्यवसायासाठी निवडण्यात आलेली जागा स्वमालकीची असेल किंवा नोंदणीकृत भाडे करारावर घेतलेली असेल तर त्या जागेची कागदपत्रे (छायांकित प्रति) सादर करावी. (आवश्यकतेनुसार)

६) अर्जदाराचे इतर बँक खात्याचे अद्यावत नोंदी असलेले पासबुकाची छायांकित प्रत सादर करावी.

७) व्यवसायासाठी प्रचलित कायद्यानुसार आवश्यक परवाने / नोंदणी दाखले / ना–हरकत प्रमाणपत्र असावे. (आवश्यकतेनुसार)

८) व्यवसायासाठीचे शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र (व्यवसायाच्या स्वरुपानुसार ) असल्यास सादर करावे.

**कर्ज मंजुरीचे निकष व मर्यादा :**

**पात्रता** : महाराष्ट्र शासनाच्या ''मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण'' योजनेअंतर्गत पात्र असणाऱ्या महिला. पात्रता सदर योजनेबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयानुसार निर्धारीत केली जाईल.

**मध्यम मुदत कर्ज –**

अ) अर्जदाराची परतफेड क्षमता तपासून, व बँक अधिकाऱ्यांचे छाननी अहवालानुसार व्यवसायाचे स्वरुप व गरजेनुसार किमान रु.१०,०००/– (अक्षरी रु.दहा हजार मात्र) ते कमाल रु.२५,०००/– (अक्षरी रु.पंचवीस हजार मात्र) पर्यंत रक्कमेचे कर्ज मंजूर करण्यात येईल.

ब) दोन, तीन किंवा चार लाभार्थी महिलांनी एकत्र येवून गट तयार करुन एकाच ठिकाणी एकच व्यवसाय करीत असल्यास प्रत्येक महिलेस एकूण रु.२५,०००/- पर्यंतचे कर्ज याप्रमाणेमात्र व्यावसायाचे स्वरुप, गरजेनुसार तसेच अर्जदारांची परतफेड क्षमता आजमावून कर्जदारांची एकूण कर्ज मागणी किंवा जास्तीत जास्त अनुक्रमे एकूण रु.५०,०००/- पर्यंत, एकूण रु.७५,०००/- पर्यंत किंवा एकूण रु.१.०० लाखापर्यंत कर्ज मंजूर करण्यात येईल.

**कर्जाचा प्रकार :-** मध्यम मुदत कर्ज

**परतफेड कालावधी –** ५ वर्ष मुदतीने, ६ महिने मोरॅटोरियम कालावधीसह. मोरॅटोरियम कालावधीत व्याज रक्कम भरणा करावी लागेल. परतफेड हप्ते रिडयुसिंग बॅलन्सप्रमाणे

**व्याजदर : द.सा.द.शे.९.००% (मा.संचालक मंडळ सभा, दि.१९/०६/२०२५, ठराव क्र.२१ अन्वये बदल/ सुधारणा)**

मा.संचालक मंडळ सभेतील ठरावान्वये वेळोवेळी निश्चित केलेला व्याजदर लागू राहील.

**कर्ज वितरण :** मंजूर कर्ज रक्कमेचे कर्जदार/ कर्जदारांचे मागणीनुसार तसेच बँकेच्या तपासणीसांच्या अहवालानुसार, शाखा व्यवस्थापक यांचे शिफारशी / मंजूरीनुसार कर्जदार/ कर्जदारांच्या बचत खात्यावर वितरण करण्यात येईल.

**कर्ज उचलीचे दस्तऐवज –**

१. कर्ज करारनामा.
२. वचनचिठ्ठी
३. लेटर ऑफ लीन / सेट ऑफ
४. सातत्य हमी पत्र
५. डेबीट ॲथॉरीटी व मंजूर कर्ज, अटी शर्ती, मान्य असलेसंबंधी पत्र.

**सर्वसाधारण नियम व अटी –**

१. कर्जदार व जामिनदार यांनी बँकेचे नाममात्र सभासदत्व (फी ची रक्कम भरणा करुन) घेणे आवश्यक आहे.
२. मुख्यमंत्री – माझी लाडकी बहिण योजनेतंर्गत दोन, तीन किंवा चार लाभार्थी महिला गटास कर्ज मंजूर केल्यानंतर त्या गटाचे संयुक्त बचत खाते (जॉईंट अकाऊंट) बँकेच्या नियमानुसार उघडण्यात यावे. त्याच खात्यामध्ये कर्ज उचल देण्यात येईल.
३. अर्जदार महिलांचे बँक नियमानुसार बचत खाते (स्कीम /कोड-१०/०१) उघडावे लागेल. या खात्यावर मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध असेल तसेच मुंबादेवी ठेव खाते उघडावे लागेल.
४. कर्जदार यांनी मुदत कर्जाची संपूर्ण व्याजासह मुद्दल रक्कमेची ६० मासिक हप्त्यांनी परतफेड करुन कर्ज खाते निरंक करावयाचे आहे.
५. कर्जदार महिला व महिलांच्या गटाने रु.१०/- प्रतिदिन किंवा दर आठवड्यास रु.७०/- किंवा प्रत्येक महिन्यास रु.३००/- इतक्या रक्कमेचे मुंबादेवी दैनंदिन ठेव खाते उघडणे आवश्यक राहिल. बँकेचे मुदत कर्ज निरंक होईपर्यंत मुंबादेवी ठेव योजनेतून कर्ज मंजूर केले जाणार नाही. तसेच सदर खात्यातून नावे रक्कम दिली जाणार नाही. तसेच कर्ज हप्ता थकीत झाल्यास सदर खात्यातील शिल्लक रक्कमेतून कर्ज हप्ता वसुल करण्याचे अधिकार बँकेस राहतील तशा आशयाचे अंडरटेकींग कर्जदारास द्यावे लागेल.

६. वैयक्तिक महिला कर्जदार तसेच कर्जदार महिला गटाने व्यावसायामधील दैनंदिन जमा रक्कमेचा भरणा मुंबै बँकेच्या शाखेतील बचत खात्यात जमा करावा लागेल व मुंबादेवी ठेव खात्यावर विहीत वेळेत ठेव रक्कम जमा करावी.

७. बँक कर्जाची रक्कम बँकेच्या तपासणीस यांचे पहाणी /छाननीनंतर अदा केली जाईल. मशिनरी व साधन / सामुग्री खरेदीसाठी रक्कम परस्पर विक्रेत्यास अदा केली जाईल. (आवश्यकते नुसार)

८. कर्जदाराने दरमहाचा हप्ता शाखेने कळविलेल्या तारखेला भरणा करावा अन्यथा कर्ज थकीत झाल्यास थकीत रक्कमेवर २% दंडव्याज आकारले जाईल. **(मा.संचालक मंडळ सभा दि.२७/०५/२०२५,ठराव क्रं.२९ अन्वये बदल / सुधारणा )**

९. कर्ज रक्कमेची संपूर्ण परतफेड होईपर्यंत, कर्ज रक्कमेचा विनियोग केवळ कर्ज ज्या कारणाकरीता घेतले आहे त्यासंबंधित व्यावसायिक गरजा भागविण्यासाठी करावयाचा आहे. तसेच सर्व आर्थिक व्यवहार या बँकेच्या खात्यावर करणे आवश्यक आहे.

१०. कर्ज परतफेडीची प्राथमिक जबाबदारी कर्जदाराची राहिल. त्याचबरोबर तेवढीच जबाबदारी कर्जदार व जामिनदारावर संयुक्त व वैयक्तिकरित्या राहिल व ती त्यांच्या वारसावरही राहिल. त्यांच्यापैकी कोणीही एका अगर अधिक व्यक्तीकडून कर्जाची वसुली करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

११. बँकेच्या पूर्व परवानगीशिवाय कर्जदारास अन्य कोणत्याही बँकेकडून व अन्य संस्थेकडून कर्ज घेता येणार नाही.

१२. व्यावसायाच्या ठिकाणी नियुक्त करावयाच्या सेवकांची नियुक्ती, वेतन किंवा इतर देय रक्कम इत्यादींची जबाबदारी संबंधीत कर्जदार यांची राहील.

१३. बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास व्यवसायाच्या ठिकाणी व निवासी पत्त्यावर भेट देण्याचा तसेच केव्हाही दप्तर तपासण्याचा व साठामाल तपासण्याचा अधिकार राहील.

१४. व्यावसायाचे जागेच्या ठिकाणी "मुंबै बँकेकडून अर्थसहाय्यीत"असा फलक प्रदर्शनी भागावर लावला पाहिजे. (आवश्यकतेनुसार)

१५. कर्जदाराने शिल्लक मालाचा, वाहनाचा, मशिनरीचा विमा, विमा कंपनीकडून उतरविला पाहीजे. विमा पॉलीसी कर्जदार व बँक यांच्या संयुक्त नावे घेण्यात यावी. (आवश्यकतेनुसार )

१६. वैयक्तिक कर्जदार / कर्जदार गटांच्या मुंबादेवी ठेव खात्यावर किंवा बचत खात्यावर रक्कम नावे टाकून कर्ज खाती वर्ग करणेचा अधिकार बँकेस राहील. त्याबाबत कर्जदार /कर्जदारांकडून लेखी अंडरटेकिंग घेणेत येईल.

१७. कर्जदार व जामिनदाराने वास्तव्याचा अथवा व्यावसायाच्या पत्त्यात बदल केल्यास त्वरीत बँकेला कळविणे आवश्यक आहे.

१८. बँक कर्ज कालावधीमध्ये महाराष्ट्र शासनाने पात्र लाभार्थी कर्जदार महिलेस / महिलांना अपात्र केले अथवा कोणत्याही कारणाने लाभ रक्कम अदा केली नाही तर यासंदर्भातील कोणत्याही तक्रारीस बँक जबाबदार असणार नाही. कर्जदार यांनी बँक कर्जाची विहित वेळेत व्याजासह परतफेड करावयाची आहे.

१९. कोणत्याही अटीत पूर्व सूचनेशिवाय बदल करण्याचा व अटी रद्द करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

## कर्ज मंजूरी व वितरण प्रक्रीया

१. शाखा व्यवस्थापकांना प्राप्त झालेल्या कर्ज मागणी अर्जाचा अभ्यास करुन संबंधित कर्ज धोरणानुसार सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेसंबंधी खात्री करुन, बँकेच्या नियमात बसत असेल तरच अशा कर्ज मागणी प्रस्तावाची तपासणी शाखा व्यवस्थापक/ शाखेतील अधिकारी यांचेकडून करुन घेण्यात यावी. बँकेच्या तपासणी अधिकारी यांनी अर्जदार व जामिनदाराच्या वास्तव्याच्या तसेच व्यवसायाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून जबाबदारीने खातरजमा करावी. त्याचसोबत अर्जदाराने निवडलेल्या व्यवसायामधून त्यास बँक कर्जाची परतफेड करणे शक्य होईल याची सुध्दा खात्री करावी. अर्जदाराच्या व जामिनदाराच्या संबंधित जास्तीत जास्त माहिती उपलब्ध करून घ्यावी. सदरची माहिती अहवालात नमूद करावी. तसेच अर्जदारास मंजूर करावयाच्या रक्कमेस शिफारस आहे / नाही याचा स्पष्ट उल्लेख अहवालात नमूद करावा.

अर्जदार व जामिनदार यांची तपासणी अहवालात नमूद असलेली माहिती, बँक कर्ज धोरणातील तरतूदी बँकेचे नियम इ. बाबी विचारात घेवून अशी कर्जे मंजूर / नामंजूर करण्याचे तसेच कर्ज उचलीचे अधिकार शाखा व्यवस्थापक यांना देण्यात येत आहेत. तथापि, या कर्ज धोरणानुषंगाने शाखांकडून होणाऱ्या सर्व कार्यवाहीचे (उदा.अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे, शाखेने केलेली खातरजमा, कर्ज मंजूर / नामंजूरीस शिफारस इ.) नियंत्रण विभागीय कार्यालय, वैयक्तिक कर्ज विभाग, केंद्र कार्यालय यांच्याकडे राहील.

२. शाखास्तरावर प्राप्त झालेल्या कर्जमागणी प्रस्तावाची नोंद संबंधित शाखेने स्वतंत्र मुव्हमेंट रजिस्टर मध्ये ठेवावयाची असून, कर्ज मंजूरी पत्र किंवा कर्ज नामंजूर केल्यास कारणांसह नामंजूरी पत्र, शाखा व्यवस्थापक यांनी वैयक्तिक कर्ज विभागास (विभागीय कार्यालय) पाठवावयाचे आहे.

३. बँक कर्जाची थकबाकी होणार नाही याची दक्षता शाखा व्यवस्थापक यांनी घ्यावयाची आहे.

४. कर्जदार यांना कर्ज उचल दिलेल्या महिन्यापासून / तारखेपासून त्यांचे मुंबादेवी दैनंदिन ठेव खाते उघडून संबंधित कर्जदाराकडून दैनंदिन ठेव रक्कम त्याचे खात्यात जमा करणेबाबत अवगत करावे.

५. बँक कर्ज थकीत गेल्यास थकबाकी तसेच संपूर्ण बँक कर्जाची वसूली बँकेच्या कायदा व कर्ज वसुली विभागामार्फत शाखांना दिलेल्या सुचनांनुसार शाखांनी करावयाची आहे.

सदर योजना महिलांना आधार म्हणून राबविण्यात येत आहे. महिलांचे केवळ १,५००/- रूपयात आर्थिक सबलीकरण होणार नाही. त्यासाठी त्यांना सुक्ष्म / लघु उद्योजक बनवून आर्थिक सबलीकरण करण्याचा प्रयत्न आहे. म्हणून या कर्ज प्रकरणाकडे महिलांना सामाजिक / आर्थिक सबलीकरण करण्याच्या दृष्टीने पाहावे लागेल. शक्य ती काळजी घेवून महिलांचा उत्कर्ष करण्याचा प्रयत्न आहे.